**M. A. II, History of Medieval Deccan**

**प्रकरण १**

**राजकिय इतिहास**

**होयसळ वंश**

कर्नाटक राज्यातील एक प्रसिद्ध राजवंश. कर्नाटकात तुंगभद्रा नदीच्या उत्तरेकडील भूप्रदेशात मुख्यत्वे भूतपूर्व म्हैसूर संस्थानात इ. स. अकरावे ते चौदावे शतक यांदरम्यान या वंशाची सत्ताहोती. गंगवाडीच्या वायव्य दिशेला असलेल्या कडूर जिल्ह्यातील मुदगीर तालुक्यात हा वंश एका खेड्यात उदयास आला. त्याच्याविषयीची माहिती मुख्यत्वे शिलालेख, ताम्रपट तसेच प्राचीन संस्कृत, कन्नड व तमिळ वाङ्मयांतून मिळते. यांशिवाय तत्कालीन इब्न बतूता, अमीर खुसरौ, फिरिश्ता यांच्या प्रवासवृत्तांतही या वंशाविषयी काही उत्तरकालीन तपशील आढळतात. तत्कालीन कोरीव लेख व वाङ्मयातून त्याचा उल्लेख होयसण, होयसळ, पोयसळ, चोयसळ आदी नावांनी आढळतो परंतु पुढे होयसळ हेच नाव अधिक रूढ झाले. या वंशाच्या उत्पत्तीविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्यांपैकी कोरीव लेखांतून आढळणाऱ्या एका कथेत या वंशाच्या नावाविषयी पुढील वृत्तांत मिळतो : "मुडगिरी तालुक्यातील एका गावात वासंतिकादेवीचे मंदिर होते. त्यात एक यती ध्यानास बसला होता. तेथे अचानक जंगलातून एक वाघ आला. तो यतीवर झडप घालणार इतक्यात तेथे आलेल्या जैन भक्ताकडे पाहून तो यती ओरडला. तेव्हा त्या यतीच्या तोंडून 'होय/पोय-सोळ' हे शब्द बाहेर पडले. ते ऐकून त्या जैनभक्ताने कमरेचा खंजीर उपसून त्या वाघाला ठार मारले." 'सळ' हे त्या तरुणाचे नाव होते व 'होय/पोय' म्हणजे मार अशी आज्ञा त्या यतीची होती. त्यावरून या वंशास पोयसळ/होयसळ हे नामाभिधान प्राप्त झाले असावे.

नृपकाम (कार. १०२२—४७) हा या वंशातील पहिला ज्ञात पुरुषहोय. तो सोसावीर (शशकपुरा) येथे सेनापथक उभारून राहत असे.त्याने राजमल्ल पेरुमाण अडी ही पदवी धारण केलेली होती. त्याचा मुलगा विनयादित्य (कार. १०४७—११००) हा विक्रमादित्य (सहावा) चालुक्यांचा सामंत असून गंगवाडीच्या वर्चस्वासाठी चालुक्य व चोलयांच्या संघर्षात तो चालुक्यांना मदत करीत होता. इरेयंग हा त्याचा मुलगा त्याच्याबरोबर युद्धात सहभागी असे. प्रथम विनयादित्य सोसावीरमधूनच कारभार पाही. पुढे त्याने दोरसमुद्र (द्वारसमुद्र/हळेबीड) येथे राजधानी स्थापिली (१०६१). शिवाय बेलूर येथेही त्याचे वास्तव्य होते. परमार राजा जगद्देव याने १०९३ मध्ये होयसळनाडवर स्वारी केली. त्याला निकराचा प्रतिकार करून विनयादित्य याने राजधानीचे संरक्षण केले. गंगवाडीवरही त्याने वर्चस्व मिळविले होते. त्याच्यानंतर त्याचा मुलगा इरेयंग (कार. ११०२—०४) राजा झाला. त्याने चालुक्य सहावा विक्रमादित्याचा सामंत म्हणून परमारांची राजधानी धारानगरीवर स्वारी करून ती जिंकली आणि एचळादेवी या चोल राजकन्येशी विवाह करून त्या घराण्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्याच्या मृत्यूनंतर बल्लाळ (कार. ११०४—०८) होयसळनाडच्या गादीवर आला. बेलूर येथून तो राज्यकारभार करी. शिवाय द्वारसमुद्र येथूनही काही दिवस त्याने कारभार पाहिला. ११०४ मध्ये त्याने चांगळांवर आक्रमण केले आणि धाकटा भाऊ बिट्टिदेव (विष्णुवर्धन) याच्या मदतीने नोळंबवाडीवर स्वारी करून पांड्यांचा पराभव केला. बल्लाळने राज्यविस्तार करून चालुक्यांचे मांडलिकत्व झुगारण्याचा प्रयत्न केला. त्याला संतती नव्हती. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ बिट्टिदेव (कार. ११०८—५२) सिंहासनाधिष्ठ झाला. होयसळ वंशातील हा श्रेष्ठ व कलाभिज्ञ राजा होय. तो विष्णूचा भक्त असून त्याने विष्णुवर्धन ही पदवी धारण केली होती. तो पराक्रमी व कुशल योद्धा होता. त्याने प्रथम गंगवाडीवर आक्रमण करून यश मिळविले. तसेच तळकाड हे नगर हस्तगत केले (१११७). त्यानंतर त्याने वीरगंग आणि तळकाडू-गोण्ड या पदव्या धारण केल्या. तसेच पूर्वेकडे कोलारपर्यंतचा प्रदेश पादाक्रांत केला आणि दक्षिण सीमेजवळ असलेली लहान राज्ये जिंकली व राज्याची सीमा कृष्णेपर्यंत नेऊन भिडविली. त्याने द्वारसमुद्राची पुनर्बांधणी करून विष्णूचे भव्य मंदिर बांधले आणि शिवमंदिराला अग्रहार दिला. दक्षिण सीमा सुरक्षित झाल्यानंतर त्याने उत्तरेकडे आक्रमण केले. त्याच्या सेनापतींनीही काही प्रदेश जिंकला, तेव्हा विक्रमादित्याने त्याला मागे रेटले. त्यामुळे विष्णुवर्धनाला चालुक्यांची सत्ता मान्य करावी लागली. त्याच्या राज्याच्या सीमा पूर्वेस नंगिली, दक्षिणेस

चेरम अन्नमलयी पर्वत, पश्चिमेस बरकनूर आणि उत्तरेस साविमलयी अशा होत्या. आपल्या विजयश्रीप्रीत्यर्थ त्याने तुलापुरुषनामक महादान केले (११३७). त्याच्या ११३१ च्या कोरीव लेखात गंगवाडी, नोळंबवाडी, बनवासी आणि हानुंगल हे प्रदेश त्याच्या आधिपत्याखाली असल्याची नोंद आहे तथापि त्याच्या कोरीव लेखांवरून तो चालुक्यांचा मांडलिक असल्याचे स्पष्ट होते. तळकाड आणि बंकापूर या त्याच्या दोन प्रशासकीय राजधान्या होत्या. विष्णुवर्धन धार्मिक दृष्ट्या सहिष्णू असून त्याने मदूरच्या शिवमंदिरास (नरसिंहचतुरवेदिमंगलम्) अनुदान दिले होते. त्याची राणी शांतलदेवी आणि सरसेनापती गंगराज हे जैन धर्मीय असून गंगराजाने हळेबीड येथे एकजैन मंदिर बांधले आणि त्याची प्रतिष्ठापना जैन यती नयकीर्तीच्या हस्ते केली. शिवाय त्याने उद्ध्वस्त झालेल्या जैन बस्तींची पुनर्बांधणी केली. उत्तरेकडील यशस्वी स्वारीनंतर परतताना त्याला लक्ष्मीदेवी या राणीपासून मुलगा झाल्याची वार्ता समजली. तेव्हा त्याने या विजयाप्रीत्यर्थ मुलाचेनाव विजय नरसिंह ठेवले व वरील जैन मंदिराचे विजय पार्श्वनाथ असे नामाभिधान केले. विष्णुवर्धनाने ११४७ पर्यंत बहुतेक शत्रूंवर विजय मिळविले होते. बहुधा तो ११५२ पर्यंत आणि अन्य काही कोरीव लेखांवरून ११५६ पर्यंत गादीवर होता. त्यानंतर त्याचा मुलगा पहिला विजय नरसिंह (कार. ११५६—७३) राजा झाला. त्याच्या मृत्यूनंतर दुसरा बल्लाळ (कार. ११७३—१२२०) राजा झाला. त्याने विष्णुवर्धनाने जे राज्य स्थापिले होते, त्याचे कार्यक्षम रीत्या परिरक्षण केले तथापि त्यासाठी त्याला कलचुरी व नोळंब या चालुक्यांच्या सामंतांशी संघर्ष करावालागला. शिवाय यादव राजांच्या प्रतिकाराला त्याने व त्याच्या सेनापतींनी यशस्वी रीत्या तोंड दिले. बनवासीच्या कदंबांवर त्याने युद्धात विजय मिळविल्यानंतर ११९३ मध्ये स्वतंत्र राज्याची घोषणा केली. तसेच त्याने चोल नृपती तिसरा कुलोत्तुंग व तिसरा राजराजा यांना सुंदर पांड्यांविरुद्ध मदत केली व सुंदर पांड्य राजाला चोलांचा पादाक्रांत केलेला मुलूख परत देण्यास भाग पाडले (१२१७). दुसरा बल्लाळ याच्यानंतर दुसरा नरसिंह( कार. १२२०—३४) होयसळनाडचा राजा झाला. त्याला चोलांचे राज्य वाचविण्याकरिता पाण्ड्य घराण्याशी सतत संघर्ष करावा लागला कारण चोलांची सत्ता दुर्बल झाली होती आणि पहिला मारवर्मा सुंदरपाण्ड्य याने चोलांची तंजावर व उरैयूर ही दोन प्रमुख शहरे जाळलीहोती. चोलांचा दुराग्रही सामंत काडव कोप-पेरुंजिंग याने या संधीचाफायदा घेऊन तिसरा राजराजा यास कैदेत टाकले. दुसऱ्यारसिंहाने महेंद्रमंगलम् येथील युद्धात सुंदर पाण्ड्याचा पराभव केला (१२३१) व राजराजास मुक्त केले. विद्याचक्रवर्तिनच्या गद्यकर्णामृत या रम्याद्भुत ग्रंथात दुसऱ्यारसिंहाबरोबरच्या पाण्ड्य, मगध व पल्लव राजांच्या संयुक्त फौजांच्या युद्धाचे रोमहर्षक वर्णन आढळते. दुसऱ्यारसिंहाने यादवांच्या आक्रमणास यशस्वी रीत्या पायबंद घातला. सिंघणाच्या दोन सेनापतींना त्याने युद्धात कंठस्नान घालून विजय मिळविला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा सोमेश्वर (कार. १२३४—६३) होयसळनाडचा राजा झाला. चोलांच्या दक्षिणेकडील राज्यास पाण्ड्य राजांपासून संरक्षण देण्याच्या उद्देशाने त्याने कण्णनूर येथे नवीन राजधानी स्थापिली आणि तिला विक्रमपूर हे नावदिले. ती श्रीरंगमपासून ८—१० किमी.वर होती. तेथून तो चोलांच्या प्रबल सामंतांपासून आपले संरक्षण करू शकला. त्याने आपल्या हयातीतच राज्याचा कारभार तिसरा नरसिंह (कार. १२५४—९१) व रामनाथ या मुलांकडे सोपविला आणि राज्याचे दोन भाग केले. त्यांपैकी तिसऱ्यारसिंहाकडे होयसळनाड व रामनाथकडे श्रीरंगमच्या परिसरातील स्वतःजवळचा भाग दिला. दरम्यान सोमेश्वराने आपली कन्या मारवर्मा ही सुंदर पाण्ड्य या राजाला देऊन सख्य केले पण पुढे जटावर्मा सुंदर पाण्ड्य हा राजा झाल्यानंतर पाण्ड्य व होयसळ यांत पुन्हा वितुष्ट आले. जटावर्मायाने चोल राज्यावर स्वारी करून तमिळनाडू व तेलंगणचा काही भाग पादाक्रांत केला. पुढे १२५७ मध्ये त्याने सोमेश्वर व रामनाथ यांचाही पराभव करून कण्णनूर हस्तगत केले पण अल्पावधीतच ते त्यांना परत केले. सोमेश्वराच्या मृत्यूनंतर (१२६३) तिसरा नरसिंह व रामनाथ यांत यादवी माजली. ती पुढे सुमारे वीस वर्षे चालू होती. यादवराजे महादेवव रामदेव यांनी होयसळनाडवर स्वाऱ्या केल्या. रामनाथ यानेही नरसिंहावर स्वारी केली. १२७९ मध्ये सुंदर पाण्ड्य राजाने कण्णनूर जिंकले आणि तिसऱ्यारसिंहावरही आक्रमण करून त्याचा काही प्रदेश हस्तगत केला. तेव्हा तो कुंडाणी येथून राज्य करू लागला. तिसऱ्यारसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा तिसरा वीर बल्लाळ (कार. १२९१—१३४२) राजा झाला. रामनाथाच्या मृत्यूनंतर (१२९५) तिसरा वीर बल्लाळ यास स्थैर्य प्राप्त झाले परंतु त्याच्या काही सामंतांनी सामुदायिक उठाव केला. तो मोडून काढतो तोच त्याला मुसलमानांच्या आक्रमणास तोंड द्यावे लागले. मुस्लिम आक्रमणामुळे होयसळनाडची जी हानी झाली, ती भरून येण्यास काही वर्षे लागली. त्याने राज्यात सत्ता दृढ करून तुंगभद्रेपर्यंतच्या प्रदेशावरपुन्हा आपली सत्ता स्थापण्याचे प्रयत्न केले. कांपिलीवर

यशस्वी स्वारी केली. त्याने पेनुगोंडा येथे आपला भाचा मचेय दंडनायक याची नेमणूक केली. पुढे त्याने १३३३ मध्ये तुळुव देशातील आळुपवंशी राणीशीविवाह केला आणि तुळुव देश होयसळनाडमध्ये विलीन केला. त्यामुळे तिसरा वीर बल्लाळ याने पश्चिम किनाऱ्यापासून पूर्व किनाऱ्यापर्यंत होयसळांची सत्ता प्रस्थापित केली. कांची नगरीतही त्याचे वास्तव्य होते. पुढे १३३८ नंतर विजयानगरच्या राजांशी होयसळांचा संघर्ष सुरू झाला. यात विजयानगरच्या राजांनी त्याचा काही प्रदेश जिंकला. अखेर मदुरेच्या सुलतानाशी लढताना त्रिचनापल्ली येथे तो मारला गेला. त्यानंतर चौथा बल्लाळ (कार. १३४३—४६) हा वीरुपाक्ष बल्लाळ या नावाने राज्यारूढ झाला. तो दुबळा होता. विजयानगरच्या राजांनी होयसळनाड जिंकून त्याचा अंतर्भाव विजयानगरच्या राज्यात केला.

**राज्यव्यवस्था :**

होयसळांची राज्यव्यवस्था दक्षिण हिंदुस्थानातील इतर घराण्यांप्रमाणेच होती. सुरुवातीला होयसळ राजे कल्याणीच्या चालुक्यांचे सामंत म्हणून महामंडलेश्वर या उपाधीने स्थानिक कारभार पाहत असत. चालुक्यांच्या अधःपतनानंतर ते स्वतंत्र झाले. होयसळांच्या राज्यव्यवस्थेची माहिती तत्कालीन कोरीव लेखांवरून मिळते. राजा हा सर्वसत्ताधारीअसून अंतिम न्याय देई. त्याच्या मदतीस पाच मंत्र्यांचे पंचप्रधानमंडळअसून पंतप्रधानास सर्वाधिकारी म्हणत. विष्णुवर्धनाच्या काळी मारियान आणि भारत असे दोन बंधू सर्वाधिकारी होते. होयसळ राजांनी, विशेषतः दुसरा वीर बल्लाळ याने, समस्तभुवनेश्वर, महाराजाधिराज, श्री पृथिवीवल्लभ, परमेश्वर आदी उपाध्या वा पदव्या धारण केल्या होत्या. राज्यातील उच्चाधिकाऱ्यांत सर्वाधिकारी, महाप्रधान, सेनापती, दण्डनायक, महाप्रचंड-दण्डनायक, युवराज आदींचा समावेश असे. कारभाराच्या सोईकरिता सर्व राज्याची जिल्ह्यांत विभागणी केली होती. जिल्ह्यास नाड म्हणत वप्रत्येक जिल्ह्यावर एक महाप्रधानाच्या हाताखालील समस्तसेनाधिपती हा प्रमुख असे. काही प्रमुख जिल्ह्यांवर युवराजांची राज्यपाल म्हणून नेमणूक केली जात असे. विषय, देश, प्रांत अशा विभागांवर दण्डनायकनामक अधिकारी असे. या वेळी न्यायव्यवस्था पूर्वापार रूढीनुसार चालत होती. महाजन मंदिराच्या पूजाअर्चा व देखभालीसाठी जकातीद्वारे काही रक्कमजमा करीत. खेड्यास नाडू म्हणत व त्यांची महासभा कर गोळा करीत असे. खेड्यात ग्रामसभा असून ग्रामांना महसूल गोळा करण्याचा व काही बाबतींत न्याय देण्याचा अधिकार होता. काही गावुण्डांनी व प्रभूंनी देवालयांना ग्रामस्थांमार्फत देणग्या दिल्याचे पुरावेही आहेत. सर्व राज्यव्यवस्था कमीअधिक फरकाने चालुक्यांप्रमाणेच होती. कधी कधी खेड्यांच्या सीमांच्या संदर्भात वाद निर्माण होत. त्या वेळी संबंधित नाडूंच्या नागरिकांची महासभा भरविली जाई व त्यात न्यायनिवाडा होई. कोरीव लेखात अशा प्रकारच्या नऊ नाडूंनी सीमांचे परीक्षण करून न्यायनिवाडा केल्याचा उल्लेख आहे. होयसळांच्या राज्यात युद्धभूमीवर मरण पावलेल्या सैनिकाच्या (वीराच्या) कुटुंबासाठी ‘अम्बाळी’ नामक करमुक्त जमीन-जुमला दिला जात असे.

**धार्मिक स्थिती :**

बहुतेक होयसळ वंशी राजे जैन धर्मीय असून त्यांनी अनेक जैन पंडितांना व विद्वानांना आश्रय दिला होता. विनयादित्याच्या कारकीर्दीत वर्धमानदेव ह्या जैन साधूस होयसळांच्या व्यवस्थापनात अनन्यसाधारण स्थान होते. इरेयंग आणि पहिला बल्लाळ यांच्यावर जैन अध्यात्मगुरूंचा प्रभाव होता. या राजांनी जैन मंदिरांना सढळ हाताने देणग्या दिल्या होत्या. या राजांपैकी विष्णुवर्धन हा पराक्रमी, शूर व श्रेष्ठराजा होता. त्याचे गुरू रामानुजाचार्य यांनी या जैन राजाला वैष्णव धर्माची दीक्षा दिली (१११६) आणि विष्णुवर्धनदेव असे त्याचे नवे नामकरणकेले. या राजाच्या मदतीने मेलकोटे येथे विष्णूचे मंदिर बांधले. तसेच तळकाड व तोन्नर (रामानुजाचे गाव) या ठिकाणी विष्णूची मंदिरे बांधली. वैष्णवांना व ब्राह्मणांना अग्रहार दिले. बेलूर येथे विजय नारायण मंदिर बांधले तथापि जैन धर्माबद्दलची त्याची सहिष्णू वृत्ती त्याने ११२५ मध्ये जैन साधू श्रीपाल त्रैविद्यादेव यांना दिलेल्या भेटीवरून आणि छल्य येथे बांधलेल्या जैन बस्तीवरून आढळते. याशिवाय काही जैन बस्त्यांना व यतींना त्याने देणग्या दिल्या. शिवाय बेलूरच्या मल्ली जिनालयाला ११२९ मध्ये देणगी दिली. तसेच द्वारसमुद्र या राजधानीतील जैन मंदिराचे नाव विजय पार्श्वनाथ ठेवले. त्याची राणी शांतालदेवी आणि सरसेनापतीगंगराज हे निस्सीम जैन भक्त होते. राणीचा आध्यात्मिक गुरू प्रभाचंद्र सिद्धान्तदेव (मेघचंद्र त्रैविद्यादेव या

साधूंचा शिष्य) असून सल्लेखना-नामक प्रायोपवेशनाद्वारे सर्वसंगपरित्याग करून तिने देहत्याग केला (११३१). विष्णुवर्धनाचे अनेक सेनापती आणि मंत्री जैन धर्मीय होते. त्यांपैकी गंगराजाने अनेक जैन बस्त्या बांधल्या, काहींची पुनर्बांधणी केली आणि अनेक जिनालयांना देणग्या दिल्या. त्याची पत्नी लक्ष्मीमती जैन धर्माच्या सल्लेखनानुसार अनंतात विलीन झाली. श्रवणबेळगोळ येथे गंगराजाने तिच्या स्मरणार्थ समाधिलेख कोरून घेतला. बोप्प, पुनिस, मनियने आणि भरतेश्वर या सेनापतींच्या जैन श्रद्धेचा उल्लेख कोरीव लेखांत निर्दिष्ट झाला आहे. पहिल्या नरसिंहाने श्रवणबेळगोळला भेट देऊन देणगी दिली होती आणि त्याने हळ्ळ या आपल्या सेनापतीद्वारे चतुर्विंशती नावाची बस्ती बांधून घेतली. नंतरचे होयसळ राजेसुद्धा निस्सीम जैन भक्त असून त्यांचे गुरू जैन यती होते. एकूण होयसळ वंशाच्या काळी राजांव्यतिरिक्त सरदार, महाजन, व्यापारी व सामान्य जन यांनी जैन मंदिरे, जिनालये, बस्त्या बांधल्या व त्यांच्या दैनंदिन व्यवहारासाठी दाने दिली.

**कला :**

संगीत, शिल्पकला, वास्तुकला इत्यादींची या सुमारास खूपच प्रगती झालेली आढळते. नृत्य व संगीत यांना होयसळांनी उत्तेजन दिले. राजघराण्यातील स्त्रिया या अनेक कलांत निष्णात असून वाद्यसंगीतातहीत्या कुशल होत्या. मरियानेच्या तीन कन्या व पहिल्या बल्लाळाच्या राण्याही कलाभिज्ञ होत्या. पहिला बल्लाळ याची पट्टराणी पद्मला ही संगीत वनृत्याची शौकीन असून स्वतः गायन व नृत्य करीत असे. तसेच राणी शांतलदेवीला नृत्य व संगीताचे उत्तम ज्ञान होते. नृत्याच्या शिक्षिकेला पात्र-जग-दळे म्हणजे नृत्यांची प्रमुख मानीत. मंदिरांवरील शिल्पांतून अनेक नृत्यांगना व वाद्ये यांचे अलंकरण आढळते. होयसळांची वास्तुकला व शिल्पकला त्यांच्या मंदिरांतून आढळते. होयसळ वंशातील राजांनी सुमारे ऐंशी मंदिरे बांधल्याचे उल्लेख कोरीव लेखांत आहेत. बेलूर, हळेबीड, सोमनाथपूर येथील मंदिरे वास्तुशिल्पशैलीसाठी प्रसिद्ध असून या मंदिरांच्या वास्तुशिल्पशैलीत चालुक्यशैलीच्या वास्तुगुणविशेषांचे मिश्रण आढळते. त्यामुळे कलासमीक्षक तिला चालुक्य-होयसळ असे संयुक्त नाव देतात.दोड्ड बसाप्पा (डंबल) मंदिराव्यतिरिक्त बहुतेक मंदिरे तारकाकृती विधानाची असून गदग येथील सरस्वती मंदिराव्यतिरिक्त सर्वांच्या पीठावर प्रदक्षिणा पथ आहे. अवशिष्ट मंदिरांत हसन जिल्ह्यातील बेलूर, हळेबीड, दोड्डगड्डहळ्ळी, आर्सिकेरे, हर्जहळ्ळी, नुग्गीहळ्ळी, होळेनरसीपूर, हुळ्ळेकेरे, आराकेरे, जगवल, बेलवडी इ. ठिकाणी आणि म्हैसूर जिल्ह्यातील सोमनाथपूर व धारवाड जिल्ह्यातील डंबल, नागलपूर, रामनाथपूर, भद्रावती इ. ठिकाणी आढळतात. मात्र बेलूर, हळेबीड व सोमनाथपूर येथील मंदिरे या सर्वांत लक्षणीय असून कलात्मक, अलंकृत, वैविध्यपूर्ण शिल्पांनी नटलेली प्रातिनिधिक मंदिरे होत. त्यांपैकी लक्ष्मीदेवी हे सर्वांत प्राचीन (१११३) असून ते कुल्लहान राऊत नावाच्या व्यापारी पतिपत्नींनी बांधले. हरिहर हेही (दोड्डगड्डहळ्ळी) सुरुवातीचे एक मंदिर आहे. हर्जहळ्ळी येथील सोमेश्वर व नुग्गीहळ्ळी येथील लक्ष्मीनरसिंह ही मंदिरे होयसळांच्या अखेरच्या काळातील होत. चेन्नकेशव (बेलूर) हे अत्यंत अलंकृत मंदिर असून होयसळ वास्तुशिल्प-शैलीचा परिपक्व आविष्कार येथे दृग्गोचर होतो. हळेबीड येथे होयसळेश्वर व केदारेश्वर ही दोन उल्लेखनीय मंदिरे असून होयसळेश्वर हे चालुक्य-होयसळ शैलीतील सर्वांगीण आविष्कार दर्शविणारे, सर्वांगांनी अलंकृत असलेले या शैलीतील आकाराने सर्वांत मोठे मंदिर होय. ते बिट्टिदेव ऊर्फ विष्णुवर्धन याने बांधले असून सुरुवातीस होयसळेश्वर व त्याच्या शेजारी शांतलेश्वर अशी दोन स्वतंत्र मंदिरे होती. नंतर ती जोडून एक केली गेली. होयसळ शैलीतील तिसरे प्रसिद्ध मंदिर सोमनाथपूर येथे असून ते सोमनाथनामक सेनापतीने १२६८ मध्ये बांधले. हे मंदिर उत्तर होयसळ स्थापत्यशैलीचे उत्तम नमुनेदार उदाहरण होय. ते होयसळेश्वर व चेन्नकेशव मंदिरांपेक्षा आकाराने लहान आहे. होयसळ मंदिरांच्या भिंतींवर, स्तंभांवर, पीठावर विपुल शिल्पांकन आहे. चौथऱ्याचे अनेक विभाग करून त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या आकृत्या, पशु-पक्षी, पाने, फुले, शरभ, हत्ती वगैरे कोरलेले आहेत. विमानाच्या खालील भागात असंख्य महिरपी कोनाडे असून त्यांत देवदेवता, मदनिका, सुरसुंदरी यांच्या अत्यंत रेखीव मूर्ती आहेत. एकूण मूर्ती बुटक्या, विपुल, अलंकार ल्यालेल्या व स्थूल आहेत.

**हळेबीड :**

कर्नाटक राज्यातील होयसळ कला-अवशेषांसाठी प्रसिद्ध असलेले हसन जिल्ह्यातील एक प्रसिद्ध ऐतिहासिक पर्यटन स्थळ. ते बेलूर तालुक्यात बेलूरच्या पूर्वेस सु. १७ किमी. व हसनच्या उत्तरेस सु. २७ किमी.वर वसले आहे. याचे मूळ नाव हळ्ळेबीडू असे होते. मध्ययुगात बहुतेक होयसळ राजांची (इ. स. १०२२–१३४२) येथे राजधानी होती. तिचा नामोल्लेख दोरसमुद्र, द्वारवती, द्वारसमुद्र इ. भिन्न नावांनी आढळतो. मलिक कफूरने इ. स. १३११ मध्ये ही राजधानी जिंकली आणि पुढे मुसलमानी आक्रमणात हे शहर उद्ध्वस्त झाले. होयसळ वंशातील राजे कलाभिज्ञ होते. त्यांनी हिंदू-जैन या धर्मांना राजाश्रय दिला आणि उत्तर चालुक्यशैलीतील मंदिरे बांधली. यांपैकी हळेबीड येथील होयसळेश्वर मंदिर हे या शैलीतील आकाराने सर्वांत मोठे आणि मूर्तिशिल्पांनी भरगच्च अलंकृत केलेले आहे. तसेच येथील केदारेश्वर मंदिर लहान आहे तथापि कलात्मक दृष्ट्या ते सर्व होयसळ मंदिरांत कदाचित श्रेष्ठ ठरेल.

होयसळेश्वराचे मंदिर बिट्टिदेव ऊर्फ विष्णुवर्धन (कार. १११०–५२) याने साधारणतः इ. स. ११४१–५० दरम्यान बांधले असावे, असे तज्ज्ञांचे मत आहे. हे मंदिर द्विकूट (दोन गर्भगृहे) पद्धतीचे जुळे मंदिर असून सुरुवातीस होयसळेश्वर व त्याच्या शेजारी शांतलेश्वर अशी दोन स्वतंत्रमंदिरे होती. यांचे मंडप जोडून ती एक केली गेली. या दोहोंची मिळूनलांबी ४५.५ मी., रुंदी ३६ मी. आणि कपोतापर्यंतची उंची ७.५ मी.आहे. याचे शिखर अस्तित्वात नाही, मात्र मंदिराला पूर्वेस दोन आणि दक्षिणोत्तर प्रत्येकी एक अशी चार प्रवेशद्वारे आहेत. मंदिराचे विधान तारकाकृती वा नक्षत्राकृती असून छायाप्रकाशाचा परिणाम साधण्यासाठी भिंतींची मांडणी स्वाभाविकच बहुकोनांकित केलेली आहे. या परिसरा-तील स्थानिक खाणींमध्ये उपलब्ध असलेला मऊ शंखजिरे (सोपस्टोन )हा दगड बांधकाम व कोरीव कामासाठी वापरलेला असून या दगडाचेवैशिष्ट्य म्हणजे तो खाणीतून काढतेवेळी अतिशय मृदू असतो व वातावरणाच्या साहचर्याने हळूहळू कठीण होत जातो. या गुणामुळेहोयसळ कलाकारांना अतिशय नाजूक व बारीक कलाकुसर करणे शक्य झाले. केदारेश्वर हे येथील कालौघात पडझड झालेले दुसरे मंदिर. ते त्रिकूट (तीन गर्भगृहे) पद्धतीचे असून दुसरा बल्लाळ (कार. ११७३–१२२०) आणि त्याची कनिष्ठ राणी अभिनव केतलदेवी यांनी १२१९ मध्ये बांधल्याचा उल्लेख शिलालेखात मिळतो. ते सोमनाथपूरच्या चेन्नकेशव मंदिराप्रमाणेच असून कलात्मक दृष्ट्या होयसळ वास्तुशिल्पशैलीतील माणिक मानण्यात येते. होयसळ मंदिरांतील विमान (शिखर) व त्यांची रचना, त्यांचे निरनिराळे घटक, स्तंभ ही सर्व अंगे प्रामुख्याने द्रविड वास्तुशैलीची मानली जातात परंतु यांमध्ये अर्धस्तंभ व गोष्टपाञ्जर यांवर शिखरांच्या ज्या लहान प्रतिकृती आहेत, त्या नागर वा इंडो-आर्यन शैलीचे घटक मानले जातात. तसेच मंदिराच्या पायऱ्यांच्या दोहो बाजूंस ज्या छोट्या देवळ्या आहेत, त्यांवरील शिखरे नागर – विशेषतः माळव्यातील भूमिज – या उपशैलीची आहेत मात्र या मंदिरात उंचीची झेप नाही, म्हणून या मिश्रशैलीस उत्तरचालुक्य-होयसळशैली असे संबोधितात.

मंदिराच्या विधानात गर्भगृह, अन्तराळ, मंडप (नवरंग) आणि मुखमंडप किंवा भद्र हे मुख्य घटक असून त्यांची रचना चौथरा (पीठ) यावर केली आहे. पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना छोट्या देवळ्या आहेत आणि समोर दोन स्वतंत्र नंदीमंडप आहेत. त्यांतील नंदींच्या बैठ्या मूर्ती अनुक्रमे चार व दोनमी. उंचीच्या आहेत. येथील द्वारशाखा अलंकृत असून चतुर्भुज द्वारपाल अत्यंत प्रेक्षणीय आहेत. ते नखशिखान्त अलंकृत असून त्यांच्या मस्तकी उभट किरीट आहेत. त्यांच्या भालप्रदेशी तिसरा नेत्र आहे. त्यावरून ते शिवगणांपैकी वाटतात. वर्तुळाकार आणि अनेक प्रकारच्या कंगोऱ्यांनी अलंकृत केलेले स्तंभ, मनोहर दगडी जाळ्या आणि दागिन्यांनी अलंकृत अशी अनेक स्त्री-पुरुषांची शिल्पे ही होयसळ मंदिराची वैशिष्ट्ये येथेदृग्गोचर होतात. पीठावर खाली गजथर, त्यावर अश्वथर, कीर्तिमुख, शार्दूलथर, नरथर, व्यालथर, हंसथर इत्यादींची रचना असून दोन थरांमध्ये एक खोल पट्टी आहे. त्यामुळे प्रत्येक शिल्पपट्ट्याला आखून देणारी छायेची काळी पट्टीच तयार होते. यांतून लतांचाही थर कल्पकतेने योजलेला आहे. यातील गजथरात सु. दोन हजार हत्ती भिन्न ढंगांमध्ये आढळतात. या स्तराचीलांबी २१३ मी. आहे. यात छायाप्रकाशाची योजना अप्रतिमपणे केलेली आहे. जंघेवर वा भिंतीवर कोनाड्यांत अथवा नुसत्या भिंतीवर तीरशिल्पात देवदेवता, देवांगना, सुरसुंदरी, यक्षी, मदनिका यांच्या मूर्ती आहेत. यांच्याही वर गोष्टपाञ्जर-अर्धस्तंभ इ. रूपके येतात. केदारेश्वर मंदिरातील शरपंजरी भीष्म आणि राम व कांचनमृग ही शिल्पे महाभारत -रामायणा तील कथा-विशेषांत अधिक बोलकी व लक्षवेधक आहेत. यातील

दक्षिणेकडील प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंत पावणेदोन मीटर उंचीच्या द्वारपालिका आहेत. या द्वारपालिका त्रिनेत्रयुक्त, सुळे स्पष्ट दाखविणाऱ्या, जटामुकुटधारी आणि हातांत डमरू, नाग आणि चेतवलेला अग्नी घेतलेल्या असून अनेक दागिने ल्यालेल्या आहेत. या द्वाराच्या गणेशपट्टीवर विविध शिल्पे, अंधकासुरावर नृत्य करणारा शिव, नंदी, मकर-हंस आणि फुले, गंधर्व, सप्तमातृका, दिक्पाल, सिंह व सैनिक असून उत्कीर्ण लेखात कलदासी या शिल्प-काराचे नाव दिलेले आहे. त्याने केदारोजई याच्यासाठी ही शिल्पयुक्त गणेशपट्टी तयार केली असे नमूद केले आहे. होयसळ नरेश पहिला नरसिंह (११५२—७३) याचा केदारोजई हा प्रमुख स्थपती होता.

होयसळेश्वर मंदिरावर असंख्य शिल्पे, शिल्पपट, कथापट, पौराणिक प्रसंग, शिव आणि विष्णू यांची कर्तृत्वदर्शक शिल्पे त्याचप्रमाणे यक्षी, नृत्यांगना, विषकन्या यांचेही शिल्पांकन आहे. एका पट्टीत देखाव्यामागून देखावे मांडलेले आढळतात. प्रारंभी भैरव, गण व मृदंगधारी गायकदिसतात. पुढे समुद्रमंथनाचा प्रसंग आहे. त्यानंतर नर्तकांचा ताफा, ईशान्येच्या बाजूस कृष्णलीला कोरल्या आहेत, तर दक्षिणेला महाभारत कथा साकार झालेली आहे. येथील मोठ्या शिल्पांत वीणाधारी सरस्वती, अर्जुनाचा मत्स्यभेद, ऐरावतावरील इंद्र-इंद्राणी, गजचर्मावर नृत्य करणारा शिव इ. शिल्पांचा अंतर्भाव होतो. यांशिवाय वाली-सुग्रीव युद्ध, किराता-र्जुनीय, चक्रव्यूहात अडकलेला अभिमन्यू , दिक्पाल, नृत्यगणेश, ब्रह्म, भैरव, गजासुरमर्दन, वेणुगोपाल, गजेंद्रमोक्ष, त्रिविक्रम, गोवर्धन-गिरिधारी, कैलास हलविणारा रावण, विष्णु-लक्ष्मी आलिंगन मूर्ती, गरुड आणि नाग, नृसिंह, वामन आणि सूर्य अशा विविध देवतांची शिल्पे आहेत. मुकुट, कर्णभूषणे, गळ्यातील विविध माला व हार, कंकणे, कमरपट्टे, बाजूबंद, तोडे, पैंजण इ. अलंकारांची येथे खैरात आहे. त्यामुळे अनेक वेळा मूळ मूर्तीचे सौष्ठव व सौंदर्य झाकले जाते.येथील मूर्तिकामात अलंकारांची रेलचेल, बुटकेपणा आणि दाट कलाकुसर आढळते. त्यामुळे मूर्तीतील लालित्य लोप पावले आहे. प्रत्येक मोठ्या मूर्तीखाली शिल्पांची नावेही आहेत. रूपण कलेतील लहान-मोठ्या मूर्तींची उधळण यांचा विचार केला असता, हळेबीडची मंदिरे भारतीय वास्तुशिल्पकलेतील परमावधीचा उच्च बिंदू वाटतात मात्र त्यांतील संयोजनात समन्वय साधला गेलेला नाही. त्यामुळे होयसळ मूर्तिकार हे उत्तम कारागीर होते पण कलाकार नव्हते, असेच म्हणावे लागते

या दोन मंदिरांव्यतिरिक्त इ. स. १२२० मध्ये बांधलेले वीरभद्र मंदिर तेथील होयसळ घराण्याच्या बोधचिन्हाच्या भव्य शिल्पासाठी प्रसिद्ध आहे. खड्‌गधारी शाल पुरुष आणि भव्य व्याघ्र लक्षणीय असून शाल अत्यंत शांत व धीरोदात्त भासतो.

हळेबीडपासून पाऊण किमी.वर बस्तीहळ्ळी नावाचे एक स्थान आहे. त्या ठिकाणी तीन जैन बस्त्या असून त्यांतील पार्श्वनाथ बस्ती गोलाकार आणि अत्यंत गुळगुळीत आरसपानी स्तंभांकरिता प्रसिद्ध आहे. तिच्यातील काळ्या वालुकाश्मात घडविलेली पार्श्वनाथाची मूर्ती सु. चार मी. उंच आहे. मधल्या बस्तीत आदिनाथ आणि शेवटच्या बस्तीत शांतिनाथ यांच्या मूर्ती आहेत. होयसळांच्या राज्यात राजघराण्यातील स्त्री-पुरुषांनी व त्यांच्या मंत्र्यांनी बांधलेल्या सु. ७२० जैन बस्त्या असल्याचे उल्लेख आढळतात. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे येथे एक पुराणवस्तुसंग्रहालय (१९६१) असून त्यात परिसरातील भग्न मंदिरांचे अवशेष जतन केले आहेत. याशिवाय ब्राँझ व काष्ठशिल्पे, भूर्जपत्रे, प्राचीन हस्तलिखिते, नाणी, ताम्रपट व काही शिलालेख यात असून या संग्रहालयातील नृत्यगणेश, ध्यानमग्न सरस्वती, दुर्गा, महिषमर्दिनी, तांडवनृत्य करणारा शिव अशी काही शिल्पे लक्षणीय आहेत. येथील संग्रहालय प्रसिद्ध असून त्यात पुरातत्त्वविद्या व वस्तुसंग्रहालयशास्त्रविषयक सुसज्ज ग्रंथालय आहे.शहरात शासकीय उच्च माध्यमिक विद्यालय आहे. येथे शासकीय विश्रामधाम तसेच पर्यटकांच्या सोयीसाठी शासनाने हॉलिडे होम्ससारख्या अनेक सोयी केल्या असून शहरात हॉटेल व्यवसायही वाढत आहे.

**बेल्लूर येथील चेन्नकेशव मंदिर :**

कर्नाटकातील बेल्लूर येथील १२व्या शतकात बांधलेल्या चेन्नकेशव मंदिर बसाल्ट ह्या अतिशय कठीण अश्या दगडात अतिशय नाजूक आणि बारकाव्यांसह केलेले अविश्वसनीय कोरीव काम बघणाऱ्याला आश्चर्यचकित करणारे आहे!... आज उपलब्ध असणाऱ्या, स्टेट ऑफ द आर्ट टेक्नॉलॉजीलासुद्धा, हे नाजूक कोरीव काम जमणार नाही... ह्या

आश्चर्यकारक मूर्ती बघितल्यावर, ज्या कलाकारांनी / कारागिरांनी, त्या घडवल्या आहेत, त्यांच्याकडे फक्त छिन्नी-हातोडा, ही बेसिक हत्यारे होती, ह्यावर विश्वास ठेवणे अवघड जाते... प्राचीन भारतात आज लय पावलेले/चोरी झालेले काही उच्च तंत्रज्ञान असणार, हे प्रकर्षाने मनात येते.

**काकतीय वंश :**

आंध्रमधील एक प्रसिद्ध वंश. ह्या वंशाचे राजे अनमकोंडा व वरंगळ ह्या राजधानींमधून सु.१०७५ ते १३०३ च्या दरम्यान आंध्र प्रदेशावर राज्य करीत होते. तेराव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्यांनी उत्तरेस विजगापट्टण, दक्षिणेस चित्तूरच्या आसपास, पूर्वेस समुद्रकिनारा व पश्चिमेस गुलबर्गा असे प्रदेश व्यापले. दक्षिणेत चोल सम्राट राजेन्द्र चोल याच्या उत्तरेतील स्वाऱ्यांमुळे उत्पन्न झालेल्या अस्थिर परिस्थितीत शूद्र जातीच्या काकतीय वंशाचा उदय झाला. या वंशातील पहिला बेत (सु.अकराव्या शतकाचा पूर्वार्ध) याने त्या परिस्थितीचा फायदा घेऊन पूर्वीच्या हैदराबाद संस्थानातील नलगोंडा जिल्ह्यात आपला अंमल बसविला. त्याचा मुलगा पहिला प्रोल आणि नातू दुसरा बेत (सु.१०७५-१०९०) यांनी चालुक्य सम्राट पहिला सोमेश्वर आणि सहावा विक्रमादित्य यांना त्यांच्या स्वाऱ्यांत साहाय्य करुन अनमकोंडा येथे आपली राजधानी केली, असे त्यांना अनमकोंडा व काझीपेट येथील अनुक्रमे १०७९ व १०९० साली कोरलेल्या लेखांत म्हटले आहे. त्याच लेखांत त्याने पुढील वारसांचीही नावे उद्धृत केली आहेत. यानंतरचा दुसरा प्रोल यांने तेलंगण व आंध्र प्रदेश जिंकून आणि चालुक्य सम्राट तिसरा तैल याचा पराभव करुन आपले स्वातंत्र्य जाहीर केले. त्याचा पुत्र रुद्र याने कर्नूलचा प्रदेश जिंकला पण त्याचा भाऊ महादेव हा देवगिरीच्या जैतुगीकडून युद्धात मारला गेला. महादेवाचा मुलगा गणपती (११९९-१२६१) याला यादवांनी काही काळ बंदीत ठेवून नंतर सोडून दिले. हा काकतीयांचा सर्वात प्रबळ राजा होय. याने बऱ्याच मोठया प्रदेशावर आले स्वामित्व स्थापले. १२६२ च्या सुमारास त्याची कन्या रुद्रांबा (१२५९-१२९५) राज्य करु लागली. तिच्या राज्यकारभाराची प्रशंसा केली आहे.

रुद्रांबेनंतर तिच्या मुलीचा मुलगा प्रतापरुद्र (१२९५-१२२३) गादीवर आला. त्याने दक्षिणेत काही विजय संपादन केले, पण १३१० मध्ये मलिक काफूर याने त्याचा पराभव करुन त्याला जबर खंडणी देण्यास भाग पाडले. तरीही त्याने पुन्हा नेलोर, कांची, त्रिचनापल्लीपर्यंत स्वाऱ्या केल्या. पुन्हा १३२३ मध्ये उलुघ खनाने त्याचा पराभव करुन त्याला बंदीवान केले आणि कातीयांचे राज्य खालसा केले.

काकतीयांच्या काळात आंध्र प्रदेशात बौद्ध व जैन धर्माचे महत्व कमी झाले होते. उत्तर व मध्य आंध्रांत शैवपंथ व दक्षिण आंध्रात रामानुजांचा वैष्णव पंथ यांचा उदय झाला. श्री बसवेश्वराच्या लिंगायत पंथाने आंध्र प्रदेशात या काळात बरीच उन्नती केली होती. काकतीय राजे व त्यांचे सरदार विद्या व कला ह्यांचे भोक्ते होते. या दोनशे वर्षाच्या काळात तेलुगू वाङ्मयाची विलक्षण वाढ झाली. केतण, तिक्कन्न, पाल्कुरिकि सोम, सोमनाथ, मल्लिकार्जुन, विद्यानाथ वगैरे कवी व ग्रंथकार या काळात झाले. यांपैकी कवी तिक्कन्न हा तुलुगू वाङ्मयाचा प्रख्यात कवी समजला जातो. काकतीयांनी तेलंगणात अनेक उत्कृष्ट देवालये बांधून त्यांना शिल्पांनी भूषित केले. अनमकोंडा येथील सहस्त्रस्तंभी मंदिर (प्रत्यक्षात हे केवळ त्रिकूटात्मक आह), पालमपेठ येथील रुद्रेश्वराचे मंदिर, पिल्लमरी येथील सरदारांनी बांधलेली मंदिरे काकतीय स्मारकेच होत. त्यांतील काही राजे स्वतः कवी असून त्यांचा संस्कृत कवींनाही आश्रय होता. पहिला रुद्र याने नीतिसार नामक ग्रंथ लिहिला होता. प्रतापरुद्राचा आश्रित विद्यानाथ याने प्रतापरुद्रकल्याण नामक नाटक आणि प्रतापरुद्रयशोभूषण हा अलंकारावरचा ग्रंथ लिहिला होता.

**पांड्य घराणे**

दक्षिण हिंदुस्थानातील एक प्राचीन घराणे. यांचा व त्यांच्या प्रदेशाचा प्रथम उल्लेख अशोकाच्या लेखात येतो. दक्षिणेत चोल, चेर व पांड्य हे प्रदेश अशोकाच्या साम्राज्याच्या बाहेर होते. अशोकाने त्या प्रदेशांत मनुष्यांच्या तसेच पशूंच्या चिकित्सेची व्यवस्था केली होती आणि त्याकरिता औषधी वनस्पती लावण्याची काळजी घेतली होती. कालिदासाने रघुवंशात उरगपुरला (आताचे उरैपूर-तिरुचिरापल्लीजवळ) पांड्य राजा उपस्थित होता असे वर्णिले आहे

तथापि या आरंभीच्या राजांविषयी आपणास फारशी माहिती नाही. त्यामध्ये नेडुं-जेळीयननामक राजाचे नाव संस्मरणीय आहे. त्याने चेर व चोल राजांचे आपल्या मदुराई राजधानीवरचे आक्रमण परतवून लावले. कोंगू आणि नीडूर येथील राजांचा पराभव केला. विद्वान व कवी यांना आश्रय दिला तसेच अनेक श्रौत याग केले, असे तद्विषयक गीतात म्हटले आहे. यानंतर आंध्रांच्या दक्षिणेतील आक्रमणामुळे तमिळ प्रदेशाच्या उत्तर सीमेवरच्या कळवारनामक लोकांना दक्षिणेस स्थलांतर करावे लागले, त्यामुळे ही चोल व पांड्य राज्ये मोडकळून पडली. पुढे सहाव्या शतकाच्या अखेरीस कडुंगोन (५९०—६२०) याने नवीन राजवंश स्थापला. या वंशाचा चौथा राजा अरिकेसरी मारवर्मा (पराकुश—६७०—७००) याने बादामीच्या पहिल्या विक्रमादित्याला पल्लवांबरोबरच्या युद्धांत साहाय्य केले. या राजांच्या पश्चिमेचे गंग आणि त्यांचे सम्राट बादामीचे चालुक्य यांच्याशी वरचेवर लढाया होत.

या वंशातील श्रीमार श्रीवल्लभ राजाने (८१५—६२) श्रीलंकेवर स्वारी करून तेथील राजधानी लुटली. त्याचा सूड लंकाधिपतीने पल्लवांच्या साहाय्याने पुढे काढला. त्यात राजपुत्र दुसरा वरगुणवर्मा सामील झाला होता. या घरभेद्याला पुढे सिंहासन मिळाले, पण पल्लवांचे स्वामित्व स्वीकारावे लागले.

यानंतर पल्लव इतिहासातून गेले पण पांड्यांना उत्तर सीमेवरील चोलांशी सामना देणे भाग पडले. परांतक चोलाशी केलेल्या युद्धात मारवर्मा द्वितीय राजसिंह याचा पराभव होऊन त्याला प्रथम लंकेत व नंतर केरळमध्ये आश्रय घ्यावा लागला. चोलांनी पांड्यांचा बराच प्रदेश खालसा केला आणि अशा रीतीने कडुंगोन याने स्थापिलेल्या पहिल्या पांड्य साम्राज्याचा अस्त झाला.

पांड्य राजांनी राजेंद्र चोल, पहिला कुलोत्तुंग व तिसरा कुलोत्तुंग या चोल राजांच्या कारकीर्दीत पुन्हा डोके वर काढण्याचा प्रयत्न केला पण त्यांस यश आले नाही.

पुढे द्वितीय मारवर्मा सुंदर पांड्य (१२१६—३८) याने तिसऱ्या कुलोत्तुंगाचा पराभव करून आपले राज्य विस्तृत केले. त्यात आता तिरुचिरापल्ली आणि पुदुकोट्टई या उत्तरेच्या प्रदेशांचा समावेश झाला होता. याचा वंशज पहिला जटावर्मा सुंदर पांड्य (१२५१—६८) याने पांड्यांचे दुसरे साम्राज्य स्थापले. त्याने चेर, होयसळ व चोल राजांचा पराभव केला, लंकेवर स्वारी करून तिचा उत्तर भाग काबीज केला आणि काकतीय गणपतीचा पाडाव करून आपल्या साम्राज्याची उत्तर सीमा नेल्लोरपर्यंत वाढविली.

मारवर्मा कुलशेखर पांड्य (१२६८—१३०९) याच्या कारकीर्दीत मार्को पोलो हा परकीय प्रवासी पांड्य देशात आला होता. त्याने भारताची जगातील सर्वोत्कृष्ट देश म्हणून स्तुती केली आहे.

कुलशेखर पांड्याला एक औरस आणि एक अनोरस असे दोन पुत्र होते. राजाने जटावर्मा वीर पांड्य या अनौरस पुत्राला गादी देण्याचे ठरविल्यामुळे औरस पुत्र जटावर्मा सुंदर पांड्य याने आपल्या पित्याचा खून करून गादी बळकावली पण वीर पांड्याने त्याला लवकरच पदच्युत केले. तेव्हा सुंदर पांड्याने मलिक काफूर याचे साहाय्य मागितले. त्याने ते मोठ्या आनंदाने देऊन दक्षिण भारताच्या टोकाकडील या शेवटच्या हिंदू राज्याची इतिश्री केली (१३१०).

इतर भारतीय राजांप्रमाणे पांड्यांनीही विद्या व कला यांना आश्रय दिला. त्यांच्या मदुराई राजधानीतील मीनाक्षीसुंदरम् देवालयाची रचना कलात्मक आहे. राज्यकारभारात पांड्यांनी एक नवीन सुधारणा केली. प्रत्येक राजा आपणाबरोबर आपल्या राजकुमारांनाही राज्यशासनाचा अधिकार देई. जटावर्मा वीर पांड्याच्या काळी त्याच्या चार पुत्रांनी त्याच्याबरोबर राज्यकारभारात भाग घेतल्याचे कोरीव लेखांत उल्लेख सापडतात. त्यामुळे काही परदेशी प्रवाशांचा असा ग्रह झाला होता की, पांड्य राज्याचे अनेक विभाग झाले पण वस्तुस्थिती तशी नव्हती.

पांड्य राजांनी काही गुहा खोदविल्या. सित्तन्नवासल, तिरुमलइपुरम येथील चित्रकला उल्लेखनीय आहे तथापि त्यांचा भर वास्तुशिल्पांवर अधिक होता. या काळात वास्तुशिल्पात गाभारा आणि शिखर किंवा विमान यांच्या रचनेत फारसा फरक पडला नाही मात्र अधिक लक्ष गोपुरांच्या बांधकामात केंद्रित झाले. गोपुरांची कल्पना प्राथमिक स्वरूपात

असल्यामुळे गोपुरे फार उंच निर्माण झाली नाहीत पण त्यांच्यातील बोजडपणा जाणवतो. ती पहिल्या दोन मजल्यांपर्यंत आयताकारी व लंबरूप राहून वर लंबाला साधारणतः पंचवीस अंशाचा कोन करीत आणि पुढे सरळ किंवा अंतर्वक्र रेषेत निमुळती होत. त्याला मध्ये द्वार असे. या काळात मंदिरांच्या भोवती संरक्षणासाठी तट उभारू लागले. एवढेच नव्हे, तर हळूहळू मंदिर मध्यबिंदू कल्पून एकाबाहेर दुसरा अशी आयताकारी किंवा चौरस तटांची संख्या वाढत गेली. या काळातील श्रीरंगम्‌चे मंदिर फारच विस्तृत असून तेथे एकात एक सात प्राकार आहेत.

मूर्तिशिल्पातील शिव, विष्णू, गणेश, द्वारपाल इ. शिल्पांवर पल्लव कलेचा मोठा प्रभाव पडलेला आहे.तिरुप्परंकुरम् येथील नटेश्वर, पार्वती, शिवगण, नंदी यांच्या मूर्ती प्रेक्षणीय आहेत. तद्वत् कळुगुमलई येथील शिव व त्याचा परिवार ही शिल्पेही लक्षणीय आहेत. येथे उमासहित शिव, मृदंगवादक, दक्षिणामूर्ती, नरसिंह, ब्रह्मा, विष्णू, स्कंद, चंद्र-सूर्य, सुरसुंदरी आणि टेकडीवरील गुहेतील पार्श्वनाथ, पद्मावती, अंबिका या सर्वांच्या मूर्ती सौंदर्यपूर्ण आहेत. उत्तरकालीन पांड्य शिल्पांपैकी मीनाक्षीसुदरम् मंदिरातील छोट्या स्तंभावलीतील दोन पंक्ती प्रतिनिधीभूत आहेत, तसेच श्रीरंगम् मंदिर काही उत्तरकालीन पांड्य शिल्पेही प्रेक्षणीय आहेत.

**सित्तन्नवासल :**

दक्षिण भारतातील एक जैन कलाक्षेत्र. ते तमिळनाडू राज्यात पुदुकोट्टईच्या वायव्येस, त्याच जिल्ह्यात सु. १६ किमी.वर पर्वतश्रेणीत वसले आहे. जैन आचार्यांचे हे इ. स. पू. दुसऱ्या शतकापासून इ. स. नवव्या शतकापर्यंत उपासनास्थान होते. याच्या परिसरात नर्तमलै, मलैयडीपट्टी वगैरे अन्य स्थाने आहेत. सित्तन्नवासल हा शब्द सिद्‌घानां वासः या संस्कृत शब्दांचे रुपांतर सिद्‌घण्णवास या प्राकृत रुपात होऊन त्याचेच तमिळ अपभ्रंश रुप सित्तन्नवासल झाले असावे, असा तज्ज्ञांचा कयास आहे. या व्युत्पत्तीवरुन हे स्थान जैन यतींच्या तपश्चर्येसाठी निर्मिले असावे असे दिसते. येथे पल्लव राजा पहिला महेंद्रवर्मा (कार. ६००—६२५) याने एक वैशिष्ट्यपूर्ण मंडपसदृश गुहा-मंदिर खोदले. ते एका सलग पाषाण पर्वतातून कोरुन काढलेले असून महेंद्रवर्माने डोंगर पोखरुन लेणी खोदण्याची प्रथा आपल्या राज्यात सुरु केली होती. सित्तन्नवासलच्या या जैन गुहा-मंदिरात अनेक कोरीव लेख आहेत. त्यांवरुन येथील मूर्ती आणि भित्तिचित्रे यांच्याविषयी विश्वसनीय माहिती मिळते. या मंदिराची लांबी ३० मी. असून रुंदी १५ मी. आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून दर्शनी आयताकार मंडपात चार स्तंभ आहेत. त्यांपैकी दोन पूर्ण स्तंभ असून त्यांवर मूर्तिकाम आहे. उर्वरित दोन अर्धस्तंभ (भित्तिस्तंभ) आहेत. त्यामागे चौकोनी गर्भगृह आहे. मंडपाच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीत देवकोष्ट (देवळ्या) असून दक्षिणेकडील देवकोष्टात अपोत्थित उठावात खोदलेली बैठी पार्श्वनाथ तीर्थंकरांची मूर्ती आहे. त्याखाली कोरीव लेख असून त्यात उलोकादित्तन (लोकादित्य) असा पार्श्वनाथांचा उल्लेख आहे. उत्तरेकडील देवकोष्टात ध्यानमुद्रेत जैन आचार्यांची प्रतिमा असून, शेजारच्या स्तंभावर लेख कोरला आहे. त्यात तिरुवाशिरियन (श्री आचार्य) असा उल्लेख आहे. दोन्ही लेख नवव्या शतकातील आहेत. मागच्या भिंतीवर तीन मूर्ती देवकोष्टकांत असून त्यांपैकी दोन तीर्थंकरांच्या व एक चक्रवर्तीन (आचार्य) यांची आहे. याशिवाय मंडपाच्या दर्शनी भागातील दक्षिण कोपऱ्यात खोदलेल्या कोरीव लेखात पांड्य वंशातील राजा श्रीमार श्री वल्लभ (कार. ८१५—८६२) व जैन आचार्य इलङ्ग गौतममाङ्ग यांनी या गुहा-मंदिराची डागडुजी केल्याचा तसेच अर्धमंडपाची पुनर्बांधणी आणि सुशोभन केल्याचा उल्लेख आहे. याशिवाय त्यांनीच हा मुखमंडप बांधला आणि एक उंच मानस्तंभ उभा केला. काही तज्ज्ञ या गुहा-मंदिराच्या निर्मितीचे श्रेय पांड्य राजांना देतात.

या गुहा-मंदिराच्या डाव्या-उजव्या बाजूस मानवी उंचीच्या पूर्णाकृती दोन समभंगातील तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. या वास्तव व आकर्षक आहेत. या लेण्यांत अजिंठ्याप्रमाणे सर्वत्र चित्रे रेखाटण्याची योजना असावी, असे भिंतीवर लावलेल्या पातळ गिलाव्यावरुन व अवशेषांवरुन वाटते मात्र काही चित्रेच अवशिष्ट आहेत. त्यांपैकी व्हरांड्याच्या तक्तपोशीवर एक नयनरम्य चित्र असून ते सुस्थितीत अवशिष्ट आहे. या चित्राचा विषय सरोवर असून त्यात कमळाची पाने, फुले, मासे, हंस, बदके आदी दिसतात. यांशिवाय काही पक्षी तसेच काही फुले वेचणारी माणसे आहेत. ह्यांचे चित्रीकरण प्रमाणबद्‌घ व वास्तव असून त्यांचे चेहरे प्रसन्न आहेत. यांशिवाय या भित्तिचित्रांत तीन पुरुषाकृती आहेत. या

पुरुषांच्या हातात कमलपुष्पे असून त्यांचा वर्ण तांबूस आहे मात्र एक पुरुष सुवर्णपीत वर्णाचा आहे. यातील पाणी सांकेतिक आरेखनाने दर्शविले आहे. मासे व हंस पाण्यात विहार करीत आहेत. उत्फुल्ल कमलपुष्पांचे देठ आणि पाने कलाकाराने रेखांकित केली असून कमलांचे देठ बाकदार व लयबद्घ आहेत. हे सरोवरदृश्य जैन पुराणातील एखाद्या कथेचा भाग असावे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

या सरोवरदृश्याव्यतिरिक्त येथे काही नृत्यांगना, सुरसुंदरी यांची चित्रे असून एक शाही दांपत्य (राजाराणी) रेखाटले आहे. डावा हात दंडमुद्रेत आणि उजवा हात पताकामुद्रेत अशी नृत्य आविर्भावात असलेली अप्सरा-सुरसुंदरी उजवीकडे किंचित कलली असून तिची नजर त्याबाजूला रोखली आहे ती नटराजाच्या भुजंग-त्रासितक नृत्यमुद्रेत चितारली आहे, तर दुसरी एक नृत्यांगना (स्तंभावर रेखाटलेली) बाळकृष्णाच्या नृत्यमुद्रेत असून तिचा डावा हात आनंदाने पसरला आहे आणि उजवा हात पताका-मुद्रेत आहे. या स्त्रीप्रतिमा, त्यांची केशभूषा, अलंकार, केशसंभारातील फुले, मोती ही आभूषणे, तसेच सडपातळ अंगकाठी, उन्नत उरोज, सिंहकटी यांमुळे विलक्षण मोहक व आकर्षक वाटतात. या सुरसुंदरींच्या आकृती प्रमाणबद्घ असून त्यांच्या अंगप्रत्यंगांतून अभिव्यक्त होणारी लयबद्घ गती चित्रकाराने अत्यंत कौशल्याने रेखाटली आहे. चित्ररेखाटनात तांबडा, पिवळा, निळा, हिरवा, काळा, पांढरा इ. रंग वापरले असून ते स्थानिक जंगलातील वनस्पती व माती यांपासून बनविलेले आहेत. चित्रांतील रंगसंगती आणि मानवी आकृत्यांची प्रमाणबद्घता यांमुळे येथील प्रतिमा वास्तववादी भासतात. ही बहुतेक सर्व रेखाचित्रे आहेत. या भित्तिचित्रांमुळे सित्तन्नवासल हे एक पर्यटनस्थळ झाले आहे. या चित्रांचे तंत्र अजिंठा चित्रशैलीसारखेच असून त्या शैलीचा प्रभाव येथे जाणवतो. या गुंफा-मंदिराचा शोध प्राध्यापक जोव्हाऊ-डुब्रेल या पुरातत्त्वज्ञाने १९२० मध्ये लावला व त्यानंतर कलासमीक्षकांचे त्याकडे लक्ष वेधले गेले. शैलीच्या दृष्टीने पाहता ही भित्तिचित्रे विविध काळात काढली असावीत.

**मदुराई :** तमिळनाडू राज्याच्या याच नावाच्या जिल्ह्यातील  मीनाक्षी मंदिरासाठी ख्याती पावलेले औद्योगिक व सांस्कृतिक शहर, लोकसंख्येच्या दृष्टीने राज्यातील मद्रास व कोईमतूर यांखालोखालचे हे तिसऱ्या क्रमांकाचे शहर (९,०४,३६२-१९८१) आहे. तिरू- चिरापल्लीच्या नैर्ऋत्येस ११३ किमी. वरील हे शहर वैगई नदीच्या उजव्या तीरावर वसले आहे. शहराच्या दक्षिणेला नारळीच्या मोठ्या बागा आहेत. सस.पासून १०० मी. उंचीवरील या शहराच्या परि-सरात अन्नमलई, नागमलई व पसुमलई ह्या प्रसिद्ध टेकड्या आहेत. मदुराई हे दक्षिण रेल्वेवरील महत्त्वाचे प्रस्थानक असून वाराणसी- कन्याकुमारी या राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ वरील हे महत्त्वाचे ठिकाण आहे. येथूनच राष्ट्रीय महामार्ग क्र. ४९ रामनाथपुरमकडे जातो.  रामनाथपुरम् व मदुराई या दोन्ही जिल्ह्यांचे प्रधान कार्यालय मदुराई येथेच आहे.

शिवाच्या जटेतून या ठिकाणी अमृताचे थेंब पडले व अमृत हे मधुरांतील मधुर असल्याने या नगरीला ‘मधुरा’ असे नाव मिळाले व त्याचाच पुढे ‘मदुरा’ व ‘मदुराई’ असा अपभ्रंश झाला असावा. चैतन्यचरितामृतात मदुराईचा ‘दक्षिण मथुरा’ असा उल्लेख आहे.  मदुराई हे पूर्वीपासून धार्मिक, व्यापारी आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. टॉलेमीच्या मते मदुराई हे दक्षिण भारताचे व्यापारकेंद्र होते. ख्रिस्तपूर्व काही शतके ग्रीस व रोम यांच्याशी त्याचे व्यापारी  संबंध होते. कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये मदुराई हे तलम रेशमी वस्त्रे व मोती यांकरिता प्रसिद्ध असल्याचा उल्लेख आढळतो.

हे प्राचीन नगर ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकापासून ते इ.स. अकराव्या शतकाच्या अखेरपर्यंत पांड्य घराण्याची राजधानी होती. तिच्या  भव्यतेमुळे व सौंदर्यामुळे तिला ‘दक्षिण भारताचे अथेन्स’ म्हणूनही संबोधिले जाते. या काळात मदुराई तेथील ‘तमिळ संघम्’ (तमिळ अकादमी) या विद्वतसमूहामुळे ख्यातनाम झाली. १३१० मध्ये मलिक काफूरने हे लुटले होते. १३२४ मध्ये मुसलमानांनी तिच्यावर कबजा मिळविला. १३७८ नंतर मदुराई विजयानगर साम्राज्याच्या आधि-पत्याखाली गेली. १५५० च्या सुमारास नायक घराण्याने या भागात आपली सत्ता स्थापून मदुराई प्रमुख केंद्र बनविले. सुमारे १०० वर्षे, विशेषतः तिरूमल नायकाच्या कारकीर्दीत (१६२३-५९) हे राज्य व  नगरी समृद्ध झाली. तथापि १६६० नंतरच्या काळात या प्रदेशावर मुसलमान, मराठे आणि म्हैसूरचा चिक्कदेव राजा यांची वक्रदृष्टी वळली  व तिचे चटके मदुराईलाही बसले. द. अर्काटच्या नबाबांनी १७३६ च्या सुमारास मदुराईवर आपला अंमल बसविला. १८०१ मध्ये या नबाबांनी वार्षिक तनखा व संरक्षण या शर्तीवर मदुराई ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या स्वाधीन केली. भारतीय स्वातंत्र्य

चळवळीच्या इतिहासात १९४० च्या पुढे मदुराई हे सविनय कायदेभंग चळवळीचे तसेच राजकीय नेतृत्वाचे एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून प्रसिद्धी पावले.

जुने शहर, टेप्पाकुलम् सरोवराकडील बागांनी व उन्हाळी बंगल्यांनी व्यापलेला भाग आणि वैगई नदीपलीकडे वसलेली नवी पेठ, असे मदुराईचे तीन प्रमुख भाग पडतात.

जुने शहर किल्ल्याच्या सभोवार वसलेले असून त्याच्या मध्यभागी मीनाक्षी मंदिर आहे. मंदिराजवळच चार अवनी मार्ग, मंदिराबाहेर लगेचच चार चैत्री मार्ग आणि मंदिराच्या भिंतीच्या आत चार आदी मार्ग आहेत. विश्वनाथ नायक या राजाने १५५९ मध्ये शहरासभोवती तटबंदी घालून, चौफेर मोठे खंदक खणून ७२ बुरूज उभारले होते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात हे तट अस्तित्वात होते. ब्लॅकबर्न नावाच्या जिल्हाधिकाऱ्याने १८४१ मध्ये शासनाच्या अनुमतीने या भिंती पाडून टाकल्या व त्या जागी घरे बांधली.

एका स्थानिक दंतकथेनुसार, मलयध्वज पांड्य राजाची मीनाक्षी ही कन्या होय. तिला जन्माच्या वेळी तीन स्तन होते व त्यांमुळे तिच्या मातापित्यांना भीती वाटली. तेव्हा एका परीने राजाला तिच्या भावी पतीच्या दर्शनाने तिचे वैगुण्य नष्ट होईल, असा दिलासा दिला. वडिलानंतर मीनाक्षी पांड्य देशावर राज्य करू लागली. एकापाठोपाठ एक देश जिंकून ती हिमालयाच्या पायथ्याशी जाऊन पोहोचली. तिने कैलासावर आक्रमण करण्याचे ठरविले, तेव्हा शिव अकस्मात तिच्या- समोर प्रकटला. ते दैदीप्यमान पुरूष-तेज पाहून मीनाक्षीला प्रथमच लज्जा निर्माण झाली आणि तिचा मधला स्तनही अदृश्य झाला. पुढे तिचा शिवाशी विवाह झाला.

पांड्य राजांनी बांधलेली मूळची वास्तू मलिक काफूरच्या आक्र-मणात जवळजवळ नष्ट झाली. फक्त मीनाक्षी व सुंदरेश्वर यांच्या मूर्ती तेवढ्या सुरक्षित राहिल्या. नायक राजांच्या कारकीर्दीत मंदिराची पुनर्रचना करण्यात आली. मीनाक्षी मंदिरातील, सर्वांत अंतर्भागातील मूर्ती वगळता, इतर मूर्ती सोळाव्या शतकानंतरच्या आहेत. मीनाक्षी मंदिराला 'वेल्ली अंबालम्' (रजत मंदिर) असे संबोधण्यात येते. या मंदिराने एकूण ५-६ हे. क्षेत्र व्यापले असून मंदिरासभोवती उंच चिरेबंदी तट आणि चारी दिशांना दरवाजे आहेत. दक्षिणेकडील तटाची उंची ७.५ मी. असून त्याच्या आतील बाजूस लहानमोठी २७ गोपुरे आहेत. मंदिराचा तटवेष्टीत परिसर २५३ मी. लांब आणि २२२.५ मी. रूंद असून त्यात मुख्य मंदिर, अनेक मठ, सभामंडप, लहान देवालये, पवित्र जलाशय इ. वास्तू आहेत.

मंदिराच्या अष्टशक्ती मंडपातील स्तंभांवर अष्टशक्तींच्या मूर्ती रेखलेल्या आहेत. या मंडपाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस गणेश व षण्मुख यांच्या मूर्ती आहेत. या दारातून आत गेल्यावर तिरूमल नायकाचा एक मंत्री मीनाक्षी नायक याचा सभामंडप लागतो. हा सहा ओळींत उभारलेल्या एकसंध शिलास्तंभांनी तोलला आहे. यानंतरचा 'मुदली पिल्लइ मंडप' (कृष्ण मंडप) असून तो अनेक मोठ्या दगडी मूर्तींनी सुशोभित केलेला आहे. हा मंडप ओलांडला की, 'सुवर्णपद्म' नावाचे एक कुंड लागते. यात स्नान करणे पवित्र मानण्यात येते. त्यात पूर्वी इंद्र स्नान करीत असे, अशी आख्यायिका आहे. कुंडाच्या पश्चिम बाजूला असलेल्या मंडपात पिंजऱ्यांतून ठेवलेल्या अनेक पोपटांच्या ओरडण्यावरून त्या मंडपाला 'किलिकट्टी मंडप' असे नाव पडले आहे. हा मंडप अनेक एकसंध ग्रॅनाइट शिलास्तंभांनी तोललेला असून त्या स्तंभांवर व्याली, पाच पांडव इत्यादींची उत्कृष्ट व मनोहारी शिल्पे खोदलेली आहेत. या मंडपातून पुढे गेले की, मीनाक्षी देवीची मूर्ती दृष्टीस पडते.

मंदिरासमोर ध्वजासाठी सुवर्णस्तंभ असून प्रदक्षिणेच्या मार्गात ज्ञान, क्रिया, बल इ. शक्तींच्या तसेच अनेक देवदेवतांच्या मूर्ती आहेत. काळ्या पाषाणाची मीनाक्षीची मूर्ती द्विभुज असून ती कमळात पूर्वा- भिमुख उभी आहे. याच आवारात मीनाक्षी मंदिराच्या उत्तरेस सुंदरेश्वराचे (शिवाचे) मंदिर आहे. या मंदिरात ६३३ शैव संतांच्या मूर्ती तसेच एका जीर्ण कदंब वृक्षाचे खोड आहे. पूर्वी या जागी कदंब- वन होते, असे म्हणतात. यामुळेच मीनाक्षीचे 'कदंबवनवासिनी' असेही दुसरे नाव आहे. या मूर्तीच्या पूर्वेकडील बाजूस तिरूमल नाय- काचा पूर्वज मटटू वीरप्पा याने बांधलेला 'वीर वसंत राय मंडप' आहे. तिरूमल मंदिराच्या दक्षिण बाजूला 'कल्याण मंडप' (विवाह मंडप) असून तेथे प्रतिवर्षी चैत्री

पौर्णिमेला संपन्न होणारा सुंदरेश्वर व मीनाक्षी यांचा विवाह-सोहळा व रथोत्सव प्रसिद्ध आहे. याच वेळी येथे गुरांचा मोठा बाजार भरतो.

वीर वसंत राय मंडपाच्या उत्तरेस ‘सहस्रस्तंभ मंडप’ असून त्यांवर अप्रतिम कलाकुसर व नक्षीकाम करण्यात आले आहे. याच मंडपात ‘मंदिर कला संग्रहालय’ उभारण्यात आलेले आहे.

पूर्वेकडील गोपुरातील प्रवेशद्वारातून आत शिरले की, ‘पुदु मंडप’ (नवीन मंडप) लागतो. तिरूमल नायक राजाने बांधलेल्या या सभा-मंडपाची कलाकुसर अत्यंत प्रेक्षणीय आहे. याच्या काही स्तंभांवर तिरूमल नायक, त्याच्या राण्या व नायकाचे पूर्वज यांची पूर्णाकृती शिल्पे आहेत. या मंडपातील नृत्याच्या पवित्र्यात असलेली नटराजाची अतिशय प्रेक्षणीय मूर्ती आहे. याच मंडपात एक स्वरस्तंभ असून त्यातील उपस्तंभावर आघात केल्यास क्रमाने सा,रे,ग,म असे सप्तस्वर निघतात.

सुंदरेश्वराचे मूळ द्राविड नाव ‘छोक्कलिंगम्’ असून तो द्रविडांचा उपास्यदेव होता. आर्य-द्रविड संस्कृतिसमन्वयाच्या आंदोलनात आर्यांनी त्याला शिवाचा अवतार मानून त्याचे ‘सुंदरेश्वर’ असे नाव ठेवले. मीनाक्षी ही द्राविड शक्तिदेवता होय. आर्यांनी तिला पार्वतीचा अवतार मानून सुंदरेश्वर शिवाशी तिचा विवाह घडवून आणला. शैव, शाक्त व वैष्णव संप्रदायांना एकत्र आणून त्यांमधील परस्परकटुता कमी करण्याचा या विवाहामागील एक उदात्त हेतू आहे. मदुराईचा राजा तिरूमल नायक याने ही प्रथा पाडली.

मदुराईमध्ये मुख्य मंदिराखेरीज अन्य काही मोठी मंदिरे आहेत. शहराच्या नैर्ऋत्य भागात ‘पेरूमल मंदिर’ हे सर्वांत मोठे मंदिर आहे. अन्य मंदिरांपैकी ‘शिव मंदिर’ (नानभैतरूवर-लाभदायी देव) व ‘मरिअम्मन’ (वांदियूर-देवीरोगाची देवता) देवीचे मंदिर ही प्रसिद्ध आहेत. मरिअम्मा देवीचे मंदिर हे वांदियूर टेप्पाकुलम् सरो- वराच्या काठावरच उभारलेले आहे. वांदियूर टेप्पाकुलम् हा उत्तर- दक्षिण असा मोठा आयताकृती जलाशय असून तो तिरूमल नायकाने बांधला. हा जलाशय वैगई नदीशी एका कालव्याद्वारे जोडलेला आहे. जलाशयाच्या मध्यभागी एक चौरसाकार बेट असून त्यामध्ये एक लहानसे श्वेतमंदिर आहे. मंदिराच्या सभोवार हिरवीगर्द झाडी व फुलांनी डवरलेले वृक्ष असून, मंदिराच्या चारी कोपऱ्यांवर आकर्षक मंडप आहेत. प्रतिवर्षी जानेवारी-फेब्रुवारी या काळात (तिरूमल नायकाच्या जन्मदिनी) टेप्पाकुलम् उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात येतो.

तिरूमल नायकाने बांधलेला राजप्रासाद हे मदुराईतील आणखी एक वैशिष्ट्य होय. भारतीय-इस्लामी शैलीत बांधलेल्या या प्रासादाचे छत, कमानी स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने अदभुत मानल्या जातात. या प्रासादाच्या दोन्ही इमारतींमधील कमानींचे बांधकाम चुनाविटा यांनी केलेले आहे. राजवाड्याच्या दर्शनी भागाला ‘स्वर्गविलासम्’ असे नाव आहे. राजप्रासाद-वास्तुशैलीच्या दृष्टीने एवढी भव्य वास्तू दक्षिण भारतात अन्यत्र कोठेही नाही. सांप्रत या राजप्रासादाचा वापर शासकीय कार्यालयांकरिता करण्यात येतो.

ब्रिटीश काळात मदुराईची वैगई नदीच्या उत्तरेला व पश्चिमेला वाढ झाली. शहरातील जुनी व प्रमुख व्यापारपेठ मंदिराजवळ आहे. रेल्वेस्थानक आणि बसस्थानक यांच्याजवळ महामार्गावर नवी बाजार- पेठ व हॉटेले, बँका यांच्यासारख्या सुविधा आहेत. किल्ल्याजवळही एक छोटी बाजारपेठ आहे. रेल्वेस्थानकाच्या पश्चिमेला औद्योगिक वसाहती, रेल्वे कर्मचाऱ्यांची वसाहत असून वैगई नदीच्या उत्तरेकडील भागात योजनाबद्ध निवासी क्षेत्रे आहेत.

मदुराईंमध्ये व उपनगरांत सूत-उत्पादन, कापड व वस्त्रोद्योग, वाहतूकसामग्री, तंबाखू, साखर यांसारख्या उद्योगांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. रेशीम, तलम वस्त्रे तसेच हातमाग उद्योग हे देखील अतिशय महत्त्वाचे उद्योग येथे आहेत. पैकारा प्रकल्पामुळे मदुराईंच्या औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. मदुराई-कामराज विद्यापीठाशी (स्था. १९६६) शहरातील सु. २५ महाविद्यालये संलग्न आहेत. अमेरिकन कॉलेज (स्था. १८८१) हे सर्वांत जुने व प्रसिद्ध महाविद्यालय आहे. प्रथम विश्व तमिळ परिषद मदुराईत जानेवारी १९८१ मध्ये भरली होती.